महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

पी.आर-३/सबसिडी/ No 04404 दिनांक : 7 FEB 2009

## वाणिज्य परिपत्रक क्र. ९२

**विषय** :- खरीप हंगाम २००८ मध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ** :- शासन निणय क्र. एससीवाय २००८/प्र.क्र. २३९/म-७ दिनांक २६.१२.२००८.

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे शासनाने खरीप हंगाम २००८ करिता राज्यातील ज्या गावांमध्ये खरीप पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी जाहीर करण्यात आलेली आहे, अशा गावांमध्ये अंतीम पैसेवारीची वाट न पहाता टंचाई परिस्थती जाहीर करण्यात आलेली आहे. अंतीम पैसेवारी जाहीर झाल्यानंतर जिल्हा निहाय गावांच्या संख्येत काही बदल होत असल्यास सुधारित आदेश निर्गमित करण्यात येतील असेही सदर शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे.

सदर शासन निर्णयात ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच खरीप हंगामात बाधीत शेतक-यांची वीज कनेक्शन थकीत बिलामुळे तोडली जाऊ नयेत असेही आदेशात नमुद केलेले आहे.

या अनुषंगाने सर्व संबंधीत क्षेत्रिय अधिका-यांना सुचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार टंचाईग्रस्त गावांतील खरीप हंगामा २००८ मध्ये बाधीत कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा वीज देयकाच्या थकीत बिलामुळे खंडीत करण्यात येऊ नये व शासन आदेशाप्रमाणे सदर गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के (म्हणजेच ३३.३३ टक्के) इतकी सवलत देण्यात यावी. सदर ३३.३३ टक्के सवलत कृषी ग्राहकांना देण्यात येणा-या शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये देण्यात यावी.

जिल्हा निहाय सुधारित खरीप हंगामात अंतीम पिक पैसेवारीनुसार ५० पैसे वा त्यापेक्षा कमी असलेल्या गावांची संख्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

खरीप हंगाम २००८ या वर्षाकरीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी. जेणेकरुन या सवलत देण्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक बोजाच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागास करता येईल व शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात खरीप हंगाम २००८ या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३ १/३ टक्के सवलत दिल्यास वीतरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोजाची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती शासनाकडून आर्थिक पूर्तत: करण्याकरीता त्वरीत पाठविण्यात यावी. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर सूट कृषी ग्राहकांना देण्यात यावी.

**प्रत माहितीस रवाना :-**

सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)

सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,

सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,

सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,

**प्रत सविनय सादर :-**

मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई.

१३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

**प्रत सविनय सादर :-**

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ, होल्डींग कंपनी मर्यादित, मुंबई.

२) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.

३) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.ट्रान्समिशन कंपनी मर्यादित, मुंबई.

४) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पॉवर जनरेशन, कंपनी मर्यादित, मुंबई.

५) संचालक (संचलन), महावितरण.

६) संचालक (वित्त), महावितरण.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) कार्यकारी संचालक (वाणिज्य), महावितरण.

२) कार्यकारी संचालक (प्रकल्प), महावितरण.

३) कार्यकारी संचालक (सांधिक नियोजन), महावितरण.

४) प्रादेशिक कार्यकारी संचालक - १ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, कल्याण.

५) प्रादेशिक कार्यकारी संचालक - २ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, पुणे .

६) प्रादेशिक कार्यकारी संचालक - ३ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, नागपूर.

७) संचालक (दक्षता व सुरक्षा), महावितरण.

**प्रत रवाना :-**

१) मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा/(कर्मचारी वर्ग)/(तांत्रिक आस्थापना))/(माहिती व तंत्रज्ञान) / (अं.ले.प.)/ (सांघीक संवाद), महावितरण, मुंबई.

२) मुख्य अभियंता (वितरण)/(अं.सु.)/(वि.ख.)/(पायाभुत सुधारणा)/ (ए.पी.डी.पी.आर.पी.)/(चाचणी कक्ष) महावितरण.

४) महाव्यवस्थापक (तांत्रिक)/ (वित्त संस्था)/(भंडार देयक)/(तपासणी नियंत्रण कक्ष),(वाणिज्य) (पायाभूत सुधारणा) महावितरण, मुंबई.

५) मुख्य अभियंता, (प्रशिक्षक संशोधन व विकास), महावितरण, नाशिक.

६) मुख्य विधि सल्लागार, महावितरण, मुंबई.

७) मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई.

८) उप संचालक (द व सु), महावितरण, मुंबई/ पुणे/नागपूर.

९) कंपनी सचिव, महावितरण, मुंबइ

१०) अधिक्षक अभियंता (विनिक), महावितरण, मुंबई

११) मा. व्यवस्थापकीय संचालक, यांचे विशेष कार्य अधिकारी, महावितरण, मुंबई

१२) अतिरिक्त महाव्यवस्थापक, संगणक केंद्र, महावितरण, नागपूर/औरंगाबाद/अकोला/ नाशिक/नेरुळ/भांडुप/कोल्हापूर/कल्याण.

१३) प्रणाली विश्लेषक, संगणक केंद्र, महावितरण, भंडारा/बुलढाणा/धुळे/जळगाव/लातूर/नांदेड/पेण/सातारा/सोलापूर.

१४) अनदेशक, संगणक केंद्र, महावितरण, अहमदनगर/अमरावती/चंद्रपूर/ पालघर/रत्नागिरी/सांगली/यवतमाळ.

१५) निवासी वरिष्ठ लेखा परिक्षण अधिकारी, (शा.ले.प.), महावितरण, प्रकाशगड/प्रकाशगंगा.

१६) सर्व भरारी पथके, महावितरण,

**प्रत सस्नेह रवाना :**

उपाध्यक्ष (भिवंडी ऑपरेशन), टोरंट पावर लिमिटेड,

जुना आग्रा रोड, अंजुर फाटा, भिवंडी- ४२१०३०२.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय, क्र.एससीवाय २००८/प्र.क्र.२३९/म-७

मंत्रालय,मुंबई

दिनांक : २६/१२/२००८

**प्रस्तावना :-**

पीक पैसेवारी हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा विषय असून प्रचलित पध्दतीनुसार पैसेवारी ही तीन टप्प्यात जाहीर करण्यात येते.

(१) हंगामी पैसेवारी
(२) सुधारीत हंगामी पैसेवारी
(३) अंतिम पैसेवारी

अंतिम पीक पैसेवारी नुसार ज्या गावातील पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी लागलेली असेल, अशा गावात टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात येते. पैसेवारी जाहीर करण्याच्या विभागावर तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| हंगाम | कोकण विभाग | पुणे व नाशिक विभाग | औरंगाबाद विभाग | नागपूर व अमरावती विभाग |
|---|---|---|---|---|
| **खरीप हंगाम** | | | | |
| हंगामी पैसेवारी | १५ सप्टेंबर | १५ सप्टेंबर | ३० सप्टेंबर | ३० सप्टेंबर |
| सुधारीत हंगामी पैसेवारी | ३१ ऑक्टोबर | ३१ ऑक्टोबर | १५ नोव्हेंबर | १५ नोव्हेंबर |
| अंतिम पैसेवारी | १५ डिसेंबर | १५ डिसेंबर | १५ डिसेंबर | १५ जानेवारी |
| **रब्बी हंगाम** | | | | |
| हंगामी पैसेवारी | --- | ३१ डिसेंबर | ३१ डिसेंबर | १५ जानेवारी |
| सुधारीत हंगामी पैसेवारी | --- | ३१ जानेवारी | ३१ जानेवारी | १५ फेब्रुवारी |
| अंतिम पैसेवारी | --- | १५ मार्च | १५ मार्च | १५ मार्च |

अंतिम पैसेवारी जाहीर केल्यानंतर ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असल.त्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती लागू करण्यात येते.

विदर्भातील अपुऱ्यां पावसामुळे पिकांच्या उत्पादनात मोठया प्रमाणावर झालेली घट विचारात घेवून टंचाई परिस्थिती तातडीने लागू करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय, क्र.एससीवाय २००८/प्र.क्र.२३९/म-७

मंत्रालय,मुंबई

दिनांक : २६/१२/२००८

**प्रस्तावना :-**

पीक पैसेवारी हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा विषय असून प्रचलित पध्दतीनुसार पैसेवारी ही तीन टप्प्यात जाहीर करण्यात येते.

(१) हंगामी पैसेवारी
(२) सुधारीत हंगामी पैसेवारी
(३) अंतिम पैसेवारी

अंतिम पीक पैसेवारी नुसार ज्या गावातील पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी लागलेली असेल, अशा गावात टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात येते. पैसेवारी जाहीर करण्याच्या विभागावर तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| हंगाम | कोकण विभाग | पुणे व नाशिक विभाग | औरंगाबाद विभाग | नागपूर व अमरावती विभाग |
|---|---|---|---|---|
| **खरीप हंगाम** | | | | |
| हंगामी पैसेवारी | १५ सप्टेंबर | १५ सप्टेंबर | ३० सप्टेंबर | ३० सप्टेंबर |
| सुधारीत हंगामी पैसेवारी | ३१ ऑक्टोबर | ३१ ऑक्टोबर | १५ नोव्हेंबर | १५ नोव्हेंबर |
| अंतिम पैसेवारी | १५ डिसेंबर | १५ डिसेंबर | १५ डिसेंबर | १५ जानेवारी |
| **रब्बी हंगाम** | | | | |
| हंगामी पैसेवारी | --- | ३१ डिसेंबर | ३१ डिसेंबर | १५ जानेवारी |
| सुधारीत हंगामी पैसेवारी | --- | ३१ जानेवारी | ३१ जानेवारी | १५ फेब्रुवारी |
| अंतिम पैसेवारी | --- | १५ मार्च | १५ मार्च | १५ मार्च |

अंतिम पैसेवारी जाहीर केल्यानंतर ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असल.त्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती लागू करण्यात येते.

विदर्भातील अपुऱ्यां पावसामुळे पिकांच्या उत्पादनात मोठया प्रमाणावर झालेली घट विचारात घेवून टंचाई परिस्थिती तातडीने लागू करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या

बैठकीत लोकप्रतिनिधींनी केली आहे. तसेच विधानमंडळातील देखील यासंदर्भात झालेल्या चर्चेच्या वेळेस लोकप्रतिनिधींनी टंचाई परिस्थिती तातडीने लागू करण्याची मागणी केली आहे. मा. महसूल मंत्री यांनी विधानसभेत याबाबत दि. २३.१२.२००८ रोजी आश्वासन दिले आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींची मागणी व राज्यातील सुधारीत हंगामी पैसेवारी परिस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ज्या गावांमध्ये खरीप पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी जाहीर करण्यात आली आहे, अशा गावांमध्ये अंतिम पैसेवारीची वाट न पाहता टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात येत आहे. जिल्हानिहाय सुधारीत हंगामी पैसेवारीची माहीती सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे देण्यात आली आहे. अंतिम पैसेवारी जाहिर झाल्यानंतर जिल्हानिहाय गावांच्या संख्येत काही बदल होत असेल तर सुधारित आदेश निर्गमित करण्यात येतील.

५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांना खालीलप्रमाणे सवलती देण्यात येत आहेत. :-

(१) जमीन महसूलात सूट

(२) सहकारी कर्जाचे रुपांतरण

(३) वीज बोलात ३३ १/३ % इतकी सूट

(४) रोहयो अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथीलता

(५) परीक्षा शुल्कात माफी

(६) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

तसेच, टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोज्ना करण्यात याव्यात:-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यकतेप्रमाणे कामे सुरु करावीत व कोणतेही रोजगारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. रोजगार मागणाऱ्यांची संभाव्य संख्या लक्षात घेऊन पुरेशी कामे शेल्फवर उपलब्ध असतील याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

(२) जेथे पिण्याच्या पाण्याची टंचाइ असेल तेथे ती दूर करण्यासाठी टँकर, बैलगाड्यांमार्फत पाणीपुरवठा करणे, तात्पुरत्या नळ योजना कार्यान्वित करणे, इत्यादी तत्सम सर्व उपाययोजना करण्यात याव्यात.

H 2491-1 अ

(३) या भागातील मोठया, मध्यम व लघु प्रकल्पामध्ये साठणारे पाणी पिण्यासाठी अग्रहक्काने राखून ठेवण्यात यावे.

(४) आवश्यक तेथे चारा डेपो उघडण्यात यावेत.

(५) आवश्यक तेथे जनावरांच्या छावण्या उघडण्यात याव्यात.

(६) खरीप हंगामात बाधीत शेतकऱ्यांकडून कोठेही जमीन महसूलाची सक्तीने वसूली करण्यात येऊ नये.

(७) खरीप हंगामात बाधीत शेतकऱ्यांची वीज कनेक्शन थकीत बीलामुळे तोडली जाऊ नयेत.

सदर आदेश पुढील आदेश काढण्यात येईपर्यंत अंमलात राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार वा नावाने,

(जि. शां. वाणी)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
मुख्य अधिकारी
कार्यकारी अभियंता (सर्व) जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा / नागरी पाणीपुरवठा
प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे, पूणे / परभणी / परळी-वैजनाथ / बीड
आयुक्त, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
मुख्य व्यवस्थापक (पतपुरवठा), बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, लोकमंगल, शिवाजीनगर, पूणे-५
महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय, ५४ वेलस्ली रोड, शिवाजीनगर, पूणे
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, ग्रारोयो / जलसंधारण
सहकार व वस्त्रोद्योग विभाग (सहकार-कार्या-२ स-५ प्रती)

कृषि व पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषि)
वित्त विभाग (व्यय-९)
पाटबंधारे विभाग (लाक्षेविप्रा)
नियोजन विभाग, रोहयो-६ (५ प्रती)
ऊर्जा विभाग (ऊर्जा-४) (५ प्रती)
शालेय शिक्षण विभाग (शाशि) (५ प्रती)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापू-१४) (५ प्रती)
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग,
कार्यासन अधिकारी, म-३ / म-११ / ल-२ / टि-२ / ब-१ / फ-४, महसूल व वन विभाग
महसूल व वन विभागातील इतर सर्व कार्यासने / म-७ कार्यासन (निवडनस्ती)

२४९१-२९७

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एससीवाय २००८/प्रक्र.२३९/म-७
दिनांक २६/१२/२००८ चे जोडपत्र

परिशिष्ट -अ

खरीप हंगाम २००८- हंगामी पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या

| अ.क्र | जिल्हा | एकूण गावांची संख्या | खरीप पेरणी केलेल्या खरीप व रब्बी गावांची संख्या | पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या | पैसेवारी जाहीर न केलेल्या गावांची संख्या | हंगामी पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी लागलेल्या गावांची संख्या | हंगामी पैसेवारी ५० पैसेपेक्षा जास्त लागलेल्या गावांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **कोकण विभाग** | | | | | | |
| १ | ठाणे | १,९९२ | १,८९३ | १,८९३ | ९९ | - | १,८९३ |
| २ | रायगड | १,९६० | १,८८६ | १,८८६ | ७४ | - | १,८८६ |
| ३ | रत्नागिरी | १,५३३ | १,५३३ | १,५२४ | ९ | - | १,५२४ |
| ४ | सिंधुदुर्ग | ७४८ | ७३५ | ७३५ | १३ | - | ७३५ |
| | एकूण | ६,२३३ | ६,०४७ | ६,०३८ | १९५ | - | ६,०३८ |
| | **पुणे विभाग** | | | | | | |
| १ | पुणे | १,९१२ | १,३७१ | १,३७१ | - | २० | १,३४३ |
| २ | सातारा | १,७२० | १,५२७ | १,५२७ | - | २९४ | १,२०४ |
| ३ | सांगली | ७३२ | ६२९ | ६२९ | - | ३७६ | २५३ |
| ४ | सोलापूर | १,१४४ | - | - | - | - | - |
| ५ | कोल्हापूर | १,२३१ | १,२३१ | १,२३१ | - | २ | १,२११ |
| | एकूण | ६,७३९ | ४,७५८ | ४,७५८ | - | ६९२ | ४,०११ |
| | **नाशिक विभाग** | | | | | | |
| १ | नाशिक | १,९६० | १,९६० | १,९६० | - | ५६० | १,४०० |
| २ | धुळे | ६७७ | ६७७ | ६७७ | - | ३७३ | ३०२ |
| ३ | नंदूरबार | ८७४ | ८७४ | ८७४ | - | ० | ८७४ |
| ४ | जळगाव | १,५०० | १,५०० | १,५०० | - | ० | १,५०० |
| ५ | अहमदनगर | १,५९१ | ५८१ | ५८१ | - | २७० | ३११ |
| | एकूण | ६,६०२ | ५,५९२ | ५,५९२ | - | १,२०३ | ४,३८७ |
| | **औरंगाबाद विभाग** | | | | | | |
| १ | औरंगाबाद | १,३८२ | १,३८२ | १,३५५ | - | ० | १,३५५ |
| २ | जालना | ९६८ | ९६८ | ७१८ | - | १० | ७०८ |
| ३ | परभणी | ८४८ | ८४८ | ८४८ | - | २४८ | ६०० |
| ४ | हिंगोली | ७०७ | ७०७ | ७०७ | - | ३०७ | ४०० |
| ५ | नांदेड | १,५७२ | १,५७२ | १,५७२ | - | ४५८ | १,११४ |
| ६ | बीड | १,३८२ | १,३८२ | १,१०६ | - | १६८ | ९३८ |
| ७ | लातूर | ९४३ | ९४३ | ९४३ | - | ६८१ | २६२ |
| ८ | उस्मानाबाद | ७३७ | ३९९ | ३९९ | - | ३९९ | ० |
| | एकूण | ८,४३९ | ८,४३९ | ७,६४८ | - | २,२७१ | ५,३७७ |

H 2491 (500-12-08) 3

hakor/H:/GR with Statement/5

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अमरावती विभाग | | | | | | | |
| १ | अमरावती | १,९८५ | १,९८५ | १,९८१ | - | १,९८१ | - |
| २ | अकोला | १,००९ | १,००९ | १,००९ | - | ७५५ | २४७ |
| ३ | यवतमाळ | २,१४४ | २,१४४ | २,१४४ | - | २६७ | १,७८३ |
| ४ | बुलडाणा | १,४१९ | १,४१९ | १,४१९ | - | ३६४ | १,०५५ |
| ५ | वाशिम | ७९३ | ७९३ | ७९३ | - | २१४ | ५७९ |
| | एकूण | ७,३५० | ७,३५० | ७,३४६ | - | ३,५८१ | ३,६६४ |
| नागपूर विभाग | | | | | | | |
| १ | नागपूर | १,९५३ | १,९३९ | १,८३३ | १०६ | १,२१२ | ६२१ |
| २ | वर्धा | १,३८७ | १,३८७ | १,३५१ | ३६ | १,२८० | ७१ |
| ३ | भंडारा | ८७८ | ८६२ | ८४५ | १७ | ३७५ | ४७० |
| ४ | गोंदिया | ९५४ | ९२५ | ९२५ | २९ | ७४४ | १८१ |
| ५ | चंद्रपूर | १,८३६ | १,४१३ | १,४०५ | ८ | ८१० | ५९४ |
| ६ | गडचिरोली | १,६८८ | १,५२४ | १,४६७ | ५७ | ९४८ | ५१९ |
| | एकूण | ८,६९६ | ८,०५० | ७,८२६ | २२४ | ५,३६९ | २,४५७ |
| | राज्याचे एकूण | ४४,०५९ | ४०,२३६ | ३९,२०८ | ४११ | १३,११६ | २६,०३४ |

-------

P 2491-3अ